क्र. १५३ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

१६ जुलै २०२३

## सामान्यकाळातील पंधरावा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानातील पेरणी करणाऱ्यांचा दाखला मानवाच्या समृध्द जीवनाला प्रेरणादायी आहे. सर्वांनी स्वर्गाचे वतनदार बनावेत अशी देवाची इच्छा आहे. म्हणूनच देव प्रत्येकामध्ये त्याच्या वचनाची पेरणी करीत असतो. मात्र सर्वजण समृध्द जीवन जगण्यास व देवाचे राज्य मिळवण्यास पात्र नसतात. बाह्य जगातील प्रलोभने आणि अपुरी श्रध्दा असल्यामुळे अंत:करणात पेरलेले देवाचे वचन हिरावून घेतले जाते. देवाचे वचन अंत:करणात मूळ धरू शकत नाही. कारण संसाराच्या चिंता, द्रव्याचा मोह आणि स्वार्थ यामुळे देवाचे वचन वाढत नाही. अनेकदा देवाचे वचन ग्रहण करून पाळणे व त्याप्रमाणे आचरण करणे खूप कठीण बनते. देवाचे वचन आत्मसात करण्यास व नीतिमत्तेने आचरण करून स्वर्गराज्याचे वारसदार होण्यास आपल्याला कृपा मिळावी म्हणून आपण पवित्र मिस्साबलीत विशेष प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे परमेश्वरा, आमच्या स्वर्गीय बापा, तुझा सत्यरुपी प्रकाश आम्हांला ख्रिस्ताकडे जाण्याचा मार्ग दाखवतो. ख्रिस्ताच्या मागून जाणाऱ्या सर्वांनी सुवार्तेशी विसंगत अशा सर्व गोष्टींचा त्याग करावा म्हणून त्यांना साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**यशया या पुस्तकातून घेतलेले वाचन ५५:१०-११**

**''पाऊस पृथ्वीला सफळ आणि हिरवीगार करतो.''**

परमेश्वर असे म्हणतो, ''पाहा, पाऊस आणि बर्फ ही आकाशातून पडतात आणि पृथ्वी भिजवून तिला सफळ आणि हिरवीगार केल्यावाचून पेरणाऱ्यास बीज, खाणाऱ्यास भाकरी दिल्यावाचून ती परत वर जात नाहीत; त्याप्रमाणे माझ्या मुखातून निघणारे वचन होईल. ते माझी इच्छा पूर्ण केल्यावाचून माझ्याकडे विफल होऊन परत येणार नाही.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**६४: १० अबकड, १०इ-११, १२-१३ अ, १३ब, १४**

प्रतिसाद : **''काही बी चांगल्या जमिनीत पडले आणि शंभरपट पीक आले.''**

१. तू पृथ्वीचा समाचार घेऊन ती भिजवली आहेस; तू तिला फार फलद्रुप करतोस
देवाची नदी जलपूर्ण आहे, भूमी तयार
करून तू मनुष्यांना धान्य पुरवतोस.

२. नांगरलेल्या जमिनीला तू भरपूर पाणी देतोस; तिचे उंचवटे सपाट करतोस,
तिला पावसाच्या सरींनी मऊ करतोस, तिच्यात उगवलेले अंकुर सफळ करतोस.

३. तू आपल्या प्रसादाने वर्ष भूषित करतोस. आणि तुझे मार्ग समृध्दीमय
झाले आहेत; रानातील कुरणेही समृध्द होतात.

४. डोंगरांना उल्हासाने वेष्टन पडले आहे;
कुरणे कळपांनी झाकून गेली आहेत,
खोरीही धान्याने सुशोभित होऊन गेली आहेत. ती मोठ्याने जयजयकार करतात
आणि गातात.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ८:१८-२३**

**''सृष्टी देवाच्या प्रगट होण्याची प्रतीक्षा अत्यंत उत्कंठतेने करत आहे.''**

आपल्यासाठी जो गौरव प्रकट होणार आहे, त्याच्यापुढे सांप्रत काळाची दु:खे काहीच नाहीत असे मी मानतो. कारण सृष्टी देवाच्या प्रगट होण्याची प्रतीक्षा अत्यंत उत्कंठतेने करत आहे; कारण सृष्टी व्यर्थतेच्या स्वाधीन करणाऱ्यामुळे सृष्टीही स्वत: नश्वरतेच्या दास्यातून मुक्त होऊन तिला देवाच्या मुलांची गौरवयुक्त मुक्तता मिळावी ह्या आशेने वाट पाहते. कारण आपल्याला ठाऊक आहे की, संबंध सृष्टी आजपर्यंत कण्हत आहे आणि वेदना भोगत आहे; इतकेच केवळ नव्हे, तर ज्या आपणाला आत्मा हे प्रथमफळ मिळाले आहे ते आपणही स्वत: दत्तकपणाची म्हणजे आपल्या शरीराच्या मुक्तीची वाट पाहत असता आपल्याठायी कण्हत आहो.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान १०:२७**

**आलेलुया, आलेलुया!**
माझी मेंढरे माझी वाणी ऐकतात;
मी त्यांना ओळखतो आणि ती माझ्यामागे येतात.
**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन १३:१-२३**

**''पेरणारा पेरणी करावयास निघाला.''**

संक्षिप्त रुपासाठी चरण (१-९) कंसातील पाठ वापरता येतील.

[येशू घरातून निघून समुद्रकिनाऱ्याशी जाऊन बसला. तेव्हा लोकांचे थवेच्या थवे त्याच्याजवळ जमले; म्हणून तो मचव्यात जाऊन बसला आणि सर्व लोक किनाऱ्यावर उभे राहिले. मग त्याने त्यांस दाखल्यांनी पुष्कळ गोष्टी सांगितल्या. तो म्हणाला, ''पाहा, पेरणारा पेरणी करावयास निघाला आणि तो पेरीत असता काही बी वाटेवर पडले आणि पाखरांनी येऊन ते खाऊन टाकले; काही खडकाळीवर पडले, तेथे त्यास फारशी माती नव्हती आणि माती खोल नसल्यामुळे ते लवकर उगवले आणि सूर्य वर आला तेव्हा ते करपले आणि त्यास मूळ नव्हते म्हणून ते वाळून गेले; काही काटेरी झाडांमध्ये पडले मग काटेरी झाडांनी वाढून त्यांची वाढ खुंटवली; काही चांगल्या जमिनीत पडले; मग त्याचे कोठे शंभरपट, कोठे साठपट तर कोठे तीसपट, असे पीक आले ज्याला कान आहेत ते ऐको.'']

मग शिष्य जवळ येऊन त्याला म्हणाले, ''आपण त्यांच्याबरोबर दाखल्यांनी का बोलता?'' त्याने त्यांस उत्तर दिले, ''स्वर्गाच्या राज्याची रहस्ये जाणण्याचे दान तुम्हांस दिले आहे, परंतु त्यांना दिलेले नाही. कारण

ज्या कोणाजवळ आहे त्याला दिले जाईल आणि त्याला भरपूर होईल; परंतु ज्या कोणाजवळ नाही त्याचे जे असेल ते देखील त्यांच्यापासून काढून घेतले जाईल. ह्यास्तव मी त्यांच्याबरोबर दाखल्यांनी बोलतो; कारण ते पाहात असता पाहात नाहीत आणि ऐकत असता ऐकत नाहीत आणि त्यांना समजतही नाही. यशयाचा संदेश त्यांच्याविषयी पूर्ण होत आहे असा की, 'तुम्ही ऐकाल तर खरे, परंतु तुम्हांला समजणारच नाही आणि पाहाल तर खरे, परंतु तुम्हांला दिसणारच नाही कारण ह्या लोकांचे अंत:करण जड झाले आहे, ते कानांनी मंद ऐकतात आणि त्यांनी आपले डोळे मिटून घेतले आहेत ह्यासाठी त्यांनी डोळ्यांनी पाहू नये, कानांनी ऐकू नये, अंत:करणाने समजू नये, वळू नये आणि मी त्यांना बरे करु नये.' पण धन्य तुमचे डोळे, कारण ते पाहात आहेत आणि धन्य तुमचे कान, कारण ते ऐकत आहेत. मी तुम्हांस नक्की सांगतो की, तुम्ही जे पाहात आहा ते पाहावयास पुष्कळ संदेष्टे आणि नीतिमान जण उत्कंठित होते. तरी त्यांना पाहण्यास मिळाले नाही आणि जे तुम्ही ऐकता ते ऐकावयास ते उत्कंठित होते, तरी त्यांना ऐकण्यास मिळाले नाही.

''आता तुम्ही पेरणाऱ्याचा दाखला ऐकून घ्या, कोणी राज्याचे वचन ऐकतो पण ते त्याला समजत नाही, तेव्हा दुष्ट येऊन त्याच अंत:करणात पेरलेले ते हिरावून घेतो; वाटेवर पेरलेला तो हा आहे. खडकाळीवर पेरलेला तो हा आहे की, तो वचन ऐकतो आणि ते तत्काळ आनंदाने ग्रहण करतो; परंतु त्यांस मूळ नसल्या कारणाने तो थोडाच वेळ टिकतो आणि वचनामुळे संकट आले किंवा छळ झाला म्हणजे तो लागलाच अडखळतो. काटेरी झाडांमध्ये पेरलेला तो हा आहे की, तो वचन ऐकतो, परंतु संसाराची चिंता आणि द्रव्याचा मोह ही वचनाची वाढ खुंटवतात आणि तो निष्फळ होतो. चांगल्या जमिनीत पेरलेला तो हा आहे की, तो वचन ऐकून ते समजतो, तो फळ देतोच देतो, कोणी शंभरपट, कोणी साठपट, तर कोणी तीसपट असे देतो.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे याचना करू या.

प्रतिसाद : **हे प्रभो, आमची श्रध्दा वाढव.**

१. पोप, कार्डिनल्स, बिशप्स, फादर्स व सिस्टर्स ह्यांना परमेश्वराने अंधारात असलेल्यांना ख्रिस्ताचा प्रकाश देण्यास कृपा द्यावी म्हणून प्रार्थना करूया.

२. ख्रिस्ताचा प्रेमसंदेश आपल्या प्रत्येकाच्या अंत:करणात दृढ व्हावा आणि अखिल मानव जातीमध्ये बंधुभाव व बंधुप्रेमाची भावना वाढीस लावण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करूया.

३. ख्रिस्ताचे कार्य अविरतपणे व अखंडपणे चालू ठेवण्यासाठी युवक-युवतींना पवित्र आत्म्याची प्रेरणा मिळावी व त्यांनी परमेश्वराच्या हाकेला साद द्यावी म्हणून आपण प्रार्थना करूया.

४. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया.

## समारोप

हे सर्वसमर्थ पित्या, तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रध्देने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्या ख्रिस्तसभेकडून या दानांचा स्वीकार कर. या ख्रिस्तप्रसादाच्या कृपा सामर्थ्याने आमचे पावित्र्य व आमची श्रध्दा वाढव. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, या ख्रिस्तप्रसादाच्या दिव्य रहस्यात आम्ही सहभागी झाल्यामुळे तुझी तारणदायी कृपा आम्हामध्ये वाढव. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

'श्रध्दा आणि प्रकटीकरण' हा ख्रिस्ती धर्मातील एक महत्त्वाचा चिंतन-विषय आहे. श्रध्दा म्हणजे ईश्वरी प्रकटीकरणाला मानवाने दिलेला एक प्रतिसाद अशी श्रध्देची एक व्याख्या केली जाते. आजची वाचने श्रध्देच्या तीन पैलूंवर प्रकाशझोत टाकतात.

**अ) श्रध्दा ही परमेश्वराची मुक्त आणि सामर्थ्यशाली देणगी होय :** आजच्या पहिल्या वाचनात (यशया ५५:१०-११) यशया संदेष्टा परमेश्वराच्या वचनाचे सामर्थ्य शब्दबध्द करतो. त्यासाठी तो पावसाची उपमा वापरतो. जसा पाऊस सृष्टीला हिरवळ, खाणाऱ्यास भाकर व पेरणाऱ्यास बी पुरवितो त्याप्रमाणे परमेश्वराचा शब्द जीवनाला प्रसन्नता, शरीराला उत्साह आणि मनाला चैतन्य प्राप्त करून देतो. श्रध्दासुध्दा मानवाचे एकंदरीत जीवन समृध्द करते. ती देवाची देणगी असते.

**ब) श्रध्दा हा ईश्वरी प्रकटीकरणाला दिलेला मानवी प्रतिसाद असतो :** आजच्या दुसऱ्या वाचनात (रोम.८:१८-२३) सृष्टी देवपुत्राची प्रतीक्षा करीत कशी कण्हत व वेदना भोगत आहे त्याचे वर्णन संत पौल करतो. ह्या कण्हण्यात व वेदना भोगण्यात ईश्वरी प्रकटीकरणाला प्रतिसाद देताना सहन करावे लागणारे दु:ख सूचित करण्यात आलेले आहे. मानवी प्रतिसाद हा नेहमीच सुखद असेल असे नाही. ह्या अर्थाने श्रध्दा हा गुलाबी पायघड्यांवरून केलेली सुखद वाटचाल नव्हे तर साक्षात् धगधगत्या निखाऱ्यांवरून केलेली खडतर वाटचाल असते.

**क) मानवी प्रतिसादावर ईश्वरी देणगीचे फळ अवलंबून असते :** आजच्या शुभवर्तमानामध्ये (मत्तय १३:१-२३ किंवा १,९) येशू पेरणाऱ्याचा दाखला देताना चार प्रकारच्या जमिनीचा उल्लेख करतो. प्रेमळ परमेश्वर हा सतत पेरत राहतो. तरीही जमीन जशी असेल तसे फळ येत राहते. हृदयाची जमीन सुपीक असेल तर ईश्वरी प्रकटीकरणाला श्रध्देचे विपुल पीक येते. अशी श्रध्दा दु:ख, संकटाच्या काळात माणसाला मोठा आधार देते.

**आत्मपरीक्षण :** परमेश्वराच्या प्रकटीकरणाला मी कशाप्रकारे प्रतिसाद देतो? माझी श्रध्दा दृढ आहे की कमकुवत आहे हे मी कशावरून समजावे?

●●●

| जुलै २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | तिसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १७ | सं आलेक्सियस (हि) | : निर्गम १:८-१४,२२/ मत्तय १०:३४-११:१ |
| मंगळ १८ | सं फ्रेडरीक (हि) | : निर्गम २:१-१५/मत्तय ११:२०-२४ |
| बुध १९ | सं उल्रीक (हि) | : निर्गम ३:१-६, ९-१२/मत्तय ११:२५-२७ |
| गुरू २० | सं एलायस आणि फ्लेवियन (हि) | : निर्गम ३:१३-२०/मत्तय ११:२८-३० |
| शक्र २१ | ब्रिन्डीसीचे सं लॉरेन्स (हि/पां) | : निर्गम ११:१०-१२:१४/मत्तय १२:१-८ |
| शनि २२ | सं मेरी माग्दालेन (पां) | : निर्गम १२:३७-४२/मत्तय १२:१४-२१ |